स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
सहकारआयुक्तवनिबंधक,
सहकारीसंस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनीक्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat२०१८@gmail.com

जा.क्र.ना.पत/ सआ ५/ कोरे चेक / वसुली/२०२३ / 383 दि:-10/०२/२०२३

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, ( सर्व )
२. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, (सर्व )

विषय :- विविध बिगर कृषी पतसंस्थांकडून कर्ज वसुलीचे अनुषंगाने कर्जदारांकडून कोरे चेक घेण्यात येत असलेबाबत..

संदर्भ :- या कार्यालयाचे दिनांक २४/०७/२००६ चे परिपत्रक

आपले लक्ष वरील विषयाचे संदर्भीय परिपत्रकीय सूचनाकडे वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

राज्यातील काही पतसंस्था कर्जाच्या परतफेडीसाठी कर्जदारांकडून पुढील तारखेचे कोरे धनादेश घेतात असे निदर्शनास आणून दिलेले आहे. याबाबत या कार्यालयास तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने, या कार्यालयाचे दिनांक २४/०७/२००६ चे परिपत्रकान्वये या बाबत खालील प्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

कर्जास तारण म्हणून संस्थेने कर्जदाराकडून कोरे चेक (केवळ कर्जदाराची सही असलेले चेक) स्विकारू नयेत.

१. कर्जास तारण म्हणून कर्जदाराकडून चेक स्विकारताना सदरचे चेक हे संबंधीत कर्जदाराकडून त्यांचे हस्ताक्षरात पूर्णपणे भरून (दिनांक,रकमेचा लेखी व अक्षरी तपशील,संस्थेचे नाव व सही)घेऊनच स्विकारण्यात यावेत.
२. कर्जदाराकडुन अशाप्रकारे त्यांचे हस्ताक्षरात पूर्णत: चेक भरून स्विकारलेनंतर कर्जदाराकडून खालील नमुन्यात संस्थेने फॉर्म भरून घ्यावा.

नमुना

मी,--------------रा.-----------,---------- नागरी सहकारी पतसंस्थेकडून रु.---------(अक्षरी ) इतक्या रकमेचे कर्ज घेतलेले असून सदर कर्जास तारण म्हणून मी घेतलेल्या कर्जास तारण म्हणून -------- या नागरी / राष्ट्रीयकृत बँकेचे चेक नं.--------- ते --------- या क्रमांकाचे एकूण -------- चेक्स मी घेतलेल्या कर्जास तारण म्हणून सदर पतसंस्थेस मी माझ्या स्वहस्ताक्षरात पूर्णपणे भरून (दिनांक,रकमेचा लेखी व अक्षरी तपशील, संस्थेचे नाव) व स्वाक्षरी करून दिलेले आहेत.

या पत्राद्वारे, पुनश्च सूचित करणे करण्यात येते की,सदर बाब आपले कार्यक्षेतील सर्व बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी सदर पत्राद्वारे दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन संस्थांकडून होईल याबाबत दक्षता घ्यावी.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्त:-

१. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(लेखापरीक्षण) ( सर्व )
२. जिल्हा विशेष लेखापरीक्षक,सहकारी संस्था, (सर्व )
३. अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.,मुंबई, सीटीसी क्र.११९/बी, तिसरा मजला,प्रमिला अपार्टमेंट,लकाकी बंगलाशेजारी ,लकाकी रोड,मॉडेल कॉलनी शिवाजी नगर पुणे -१६
४. अध्यक्ष/ व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.,मुंबई, ६/६०३,दुर्गा कृपा को-ऑप हौसिंग सोसायटी ,हनुमान चौक, नवघर रोड,मुलुंड (पू) मुंबई-४०००८१